आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in




दैनिक

# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १६७ वा ● रविवार दि. ०१ डिसेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – अहो, लाडकी पेक्षा दोडकी होणे बरे वाटते, पंरतू सरकारने बहिण भावा मध्ये वितूट आणून घराघराच्या भिंतीलाच भेगा पाडल्यासारखे दिसते आहे. त्यामूळे हे असे का घडते, हेच कळत नाही, डोकं बधीर झालेलं दिसतं आहे.

दुसरा – अरे, भारतीय लोकशाही ही सामाजीक न्यायावर समानतेवर आधारीत असली तरी संविधानानुसार महिला पुरुषांना समान हक्क आहे, पंरतू सत्ताधारी पक्षाने लाडकेपणाचा आव आणून भावनीकतेतून महिलांना लाडकी बहिण समजून पुरुषांना लोडणे बनविले, हयातून सत्ताकारण दिसते, त्यामुळे लाडकी आणि दोडकी म्हणून काय बसलासं गप्प बसं.

एक – अहो, थोरली असो की थाकटी असो, मधली असली तरी चालते, पंरतू या सरकारने राखी ही महाग केली, आणि सत्तेसाठी सुंदोपसंधी करीत असल्यामूळे फडणवीस, शिंदे, पवार हे कडू दोडक्यासारखेच वाटतात, म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, त्या शिंदे, पवार, फडणवीसांना कडू दोडका म्हणू नकोसं, त्यांचीच सत्ता येणार आहे, म्हणून दुध पिताना ताक समजून ते फुकूण प्यावे लागते, हे साधे गणित तूला कळत नाही काय, अनेक वेळा समजावून सांगून ही, तू भलते, सलते बोलत राहातोसं, गप्प बसं ना.

एक – अहो, असला शहाणपणा मला शिकवू नका, लाडक्या बहिणी आणि लाडके भाऊ विखूरलेले आहेत, घरात घरपण राहिलेले नाही, पुरुष प्रधान संस्कृती असताना ही, महिलांच्या लाटण्यासमोर पुरुषांना मान झुकवावी लागते आहे, त्यामूळे लाडकी पेक्षा दोडके होणे बरे वाटते, म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, भारता मध्ये पुरुष प्रधान संस्कृती असली तरी संविधाना मध्ये महिला पुरुषांना समान हक्क असल्यामूळे प्रारंभी तत्कालीन अर्थ मंत्री अजित पवार यांनी लाडकी बहिण लादली, आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणीला भरभरुण दिले, त्यामुळे राष्ट्रीय स्वंयसवेक संघ आणि भाजपाला घवघवून यश मिळाले, आणि लाडक्या बहिणीनां दोडके होण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही, मग याचे उत्तर कोण देणार, हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो, गप्प बसं ना.

## काय बोलता राव ?

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचा निकाल ला–गून आठवडाभर झाला तरी, आत्तापर्यंत सरकार स्थापन झाले नाही, पंरतू महायुतीच्या माध्यमातून मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नांव जाहिर होताच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्णयाला फडणवीस हे स्थगीती देत आहेत, हा काय चांडाळ पणा असावा, हे कळतच नाही. हे देवेंद्र फडणवीस भावी मुख्यमंत्री आहेत की, मागील निर्णयाला कात्री देणारे कसाई असावेत की काय अशीच कुजबूज होते आहे.

**काय बोलता राव !**

अरे, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य वक्फ मंडळाला २० कोटी रुपयाची तरतूद केली होती. तसा निर्णय अल्पसंख्यांक विभागाच्या सचिव विशाखा आढाव यांनी काढला होता, पंरतू तो निर्णयच काल सायंकाळी चार वाजता भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय मागे घेवून वक्फ मंडळाच्या निधी निर्णयाला स्थगीती दिली. त्यामूळे मुख्यमंत्री होण्या आधीच देवेंद्र फडणवीस हे असे निर्णय रद्द करीत असतील तर बहिणीला ही गळफास देण्यासाठी ते मागेपुढे राहाणार नाहीत, त्यामुळे उद्याच्या सत्ताकारणात धर्मनिरपेक्ष पुरोगामी महाराष्ट्राचे काय होईल हे सांगता येणे कठीण वाटते, म्हणून शिंदे यांची रणनीती फडणवीसाना महागात पडते की काय, असेच प्रसार माध्यमातून उलटसूलट चर्चांचे उधाण आल्याचे दिसते आहे. मग बोला दाजीबा !




# गुन्हेगार आमदार यांना मंत्री पद नको, जनतेची मागणी ?

लातूर (दैलाप्रप्र) : महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत महायुतीला भरभरुण यश मिळाले, महाविकास आघाडीचा सापसूफडा झाला, पंरतू महाराष्ट्र विधानसभेतील २८८ आमदारा पैकी, १८७ आमदारावर हत्या, अपहरण, महिलांवरील अत्यांचाराचे, भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल आहेत, तसे त्यांच्या प्रतिज्ञा पत्रात नमूद असल्यामूळे असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक आणि रिफॉर्म्स महाराष्ट्र इलेक्शन वॉच या संस्थेच्या शोध अहवालानुसार भाजपाच्या १३२ पैकी ९२ आमदार शिंदे सेनेच्या ५७ पैकी ३८ आमदार, अजित पवार राष्ट्रवादीचे



४१ पैकी २० आमदार, ठाकरे सेनेचे २० पैकी १३ आमदार, कॉग्रेसचे ९ तर राष्ट्रवारी शरद पवारांच्या ५ आमदारावर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्यामूळे महायुतीने गुन्हा दाखल असलेल्या आमदारांना मंत्री मंडळात स्थान देवू नये, आणि महाविकास आघाडीने ज्या आमदारावर गुन्हे दाखल आहेत अशांना सत्तापदावर बसवू नये, आणि महायुती, महाविकास आघाडीतील ज्या कोणा आमदारावर गंभीर गुन्हे दाखल आहेत, त्यांची नांवे प्रसार माध्यमातून जाहिर करावे अशी लोक मागणी होताना दिसते आहे.

# लातूर ग्रामीणची भाजपचा बालेकिल्ला अशीच ओळख निर्माण व्हावी– आ. रमेशआप्पा कराड

लातूर– विधानसभेची निवडणूक जिंकली एवढ्यावरच न थांबता येणाऱ्या काळात होणाऱ्या ग्रामपंचायत सोसायटीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका आपल्याला जिंकायच्या आहेत आणि लातूर ग्रामीण मतदार संघाची भाजपाचा बालेकिल्ला म्हणून ओळख निर्माण करायची आहे यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आजपासूनच कामाला लागावे अशी सूचना नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांनी दिल्या.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांचा घवघवीत यश संपादन केल्यानंतर आज शनिवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपासह महायुती कार्यकर्त्यांच्या वतीने जाहीर सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष अँड दशरथ सरवदे, शिवसेनेचे युवा जिल्हाध्यक्ष कुलदीप सूर्यवंशी, अध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक ज्ञानोबा भिसे, माजी तालुकाध्यक्ष रामराव मोरे, विठ्ठल कस्पटे, श्रीकृष्ण पवार, सुभाष वाघ, संगमेश्र्वर स्वामी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या सत्कार कार्यक्रमास पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावा गावातील भाजपा सह महायुतीचे कार्यकर्ते मतदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून काम केले केलेल्या प्रयत्नाला यश आले याबद्दल सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण मतदार संघातून देशमुख पराभूत होतील असे कोणालाच वाटत नव्हते मात्र ही लढाई आपण जिंकणार याचा मला आत्मविश्र्वास होता कार्यकर्त्याच्या मेहनतीमुळेच हे शक्य झाले. ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होती देशमुख यांनी अनेकांना विकत घेण्याचा प्रयत्न केला माझा गरीब कार्यकर्ताच काय तर सामान्य मतदारही विकला गेला नाही. सत्ता आणि पैशाच्या मागे जनता जात नाही विकास कामामागे जनता असते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. काँग्रेस पुढार्याच्या अनेक गावात सामान्य कार्यकर्त्यांनी भाजपाला मताची आघाडी मिळवून दिली याचा मला अभिमान आहे.

विधान परिषदेचा आमदार या नात्याने काम करत असताना मतदारसंघात शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आणि गावातील विकास कामांना गती दिली आपण केलेल्या कामामुळेच गावा गावात कार्यकर्त्यांच्या शब्दाला मतदारांनी मान दिला आणि भाजपाच्या पाठीशी राहून भरभरून मतदानरुपी आशीर्वाद दिले. आता विधानसभा आमदारकीच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचं सोनं करून दाखवू असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मतदार संघात गेल्या पंधरा वर्षातील विकासाचा मोठा बॅकलॉग भरून काढायचा आहे यासाठी विकासाचा आराखडा तयार करून विविध कामांना निश्र्चितपणे मंजुरी मिळून घेऊ. कार्यकर्त्यांनीही सर्व समाज घटकांना सोबत घेऊन गोरगरीब जनतेचे प्रश्र्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत कोणाचीही अनुरूप होणार नाही याची काळजी घ्यावी पर्यायाने आपल्या गावचा तालुक्याचा आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधू असेही त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून भविष्यातील कार्याला शुभेच्छा दिल्या.

# ‘एनसीसी’मधील सहभागामुळे मुलींमध्ये नेतृत्वगुणांचा विकास : राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन

मुंबई : ‘एनसीसी’मधील सहभागामुळे मुलींचा आत्मविश्र्वास वाढतो, त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास होतो. विकसित भारताचे उद्दिष्ट गाठताना महिलांची अर्थव्यवस्थेतील भागीदारी वाढणेही आवश्यक आहे. मुलींनी ‘एनसीसी’मध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती सी.पी.राधाकृष्णन यांनी केले.



‘एनसीसी’च्या माध्यमातून मुलींचे सक्षमीकरण’ या विषयावर आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत आज शनिवारी (दि. ३० नोव्हेंबर) के. सी. महाविद्यालयाच्या सभागृहात झाले, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. महाराष्ट्र एनसीसी संचालनालय व एचएसएनसी विद्यापीठ यांनी संयुक्तपणे चर्चासत्राचे आयोजन केले होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ‘एनसीसी’च्या विस्ताराबाबत सूचित केले आहे. यादृष्टीने जास्तीत जास्त युवक–युवतींनी ‘एनसीसी’मध्ये आपला सहभाग वाढवला पाहिजे असे सांगून ‘एनसीसी’मुळे शिस्तपालनाचे महत्त्व कळते व देशभक्तीची भावना जोपासली जाते असे राज्यपालांनी सांगितले.

शिस्त नसली तर यश मिळत नाही त्यामुळे युवकांनी ‘शिस्त’अंगी बाणवली पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले. युवक–युवतींनी दिवसातील किमान १५ मिनिटे योग व ध्यानधारणेसाठी दिल्यास त्यांची एकाग्रता शक्ती वाढेल असे सांगताना युवकांनी मोबाईलवरील वेळ नियंत्रित ठेवला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

चर्चासत्राला ‘एनसीसी’चे महासंचालक लेफ्टनंट जनरल गुरबीर पाल सिंह, एचएसएनसी विद्यापीठाचे प्रोव्होस्ट डॉ.निरंजन हिरानंदानी, सर्जन व्हाईस ॲडमिरल आरती सरीन, महासंचालक सशस्त्र सैन्य दल वैद्यकीय महाविद्यालय, दिप्ती चावला, अतिरिक्त सचिव, संरक्षण मंत्रालय, एचएसएनसी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.हेमलता बागला, एनसीसी महाराष्ट्राचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंद्र सिंग तसेच सैन्य दलातील अधिकारी, जवान व एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.

# यावर एकनाथ शिंदे लवकरच मोठा निर्णय घेणार!

मुंबई :गेल्या काही दिवसांपासून मुख्यमंत्रिपदाबाबत चर्चा सुरु असताना भाजपाचे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी गृह खात्याची मागणी केली आहे. मात्र त्यांची ही मागणी जोर धरत नसल्याम ुळे राजकीय रिंगणात पेच वाढत चालला आहे. अशातच शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना संजय शिरसाट यांनी म्हटले की, राजकीय पेचप्रसंग आला तर विचारासाठी वेळ हवा असेल तर शिंदे त्यांच्या गावी जाण्याला प्राधान्य देतात. ते त्यांच्या दरे या गावी जातात. या गावात फोनही लागत नाही. आरामात विचार करून निर्णय घ्यायचा असेल तर शिंदे त्यांच्या गावी जातात. पण सायंकाळपर्यंत ते नक्कीच मोठा निर्णय घेतील, असे वक्तव्य आमदार संजय शिरसाट यांनी मांडले.

दरम्यान, महायुतीची होणारी बैठक दोन दिवसांनी अमित शाह यांचा फोन आल्यानंतर होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र दुसरीकडे एकनाथ शिंदे अचानक त्यांच्या गावी निघून गेल्यानेच बैठक पुढे ढकलण्यात आल्याची चर्चा सुरू आहे.

# एड्स प्रतिबंधामध्ये युवकाची मोलाची भूमिका

०१ डिसेंबर जागतिक एड्स दिन. या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये जिल्हा रूग्णालयाकडून विविध जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आपण सर्वांनी सहभागी होऊ या सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊया या दिनानिमित्त हा विशेष लेख.सुप्रसिद्ध लावणीकार, कवी राम जोशी मानवी नरदेहाबाबत वर्णन करताना ही लावणी गायलेली आहे. चौऱ्यांशी दशलक्षकोट्या योन्या फिरल्यानंतर मानवाला दुर्लभ असा नरदेह प्राप्त होतो. त्यामुळे त्याने या देहाचा उपयोग विधायक कार्यासाठी करणे आवश्यक आहे. परंतु आज वाढती व्यसनाधिनता नैतिक मुल्याचा ऱ्हास, तसेच सहजीवनाचा वाईट परिणाम देशातील लोकांवर मुख्यत्वे करुन युवकांवर पडत असलेला पहावयास मिळत आहे. त्याचा परिणाम देशाची भावी आधारस्तंभ असणारी तरुण पिढी ही एचआयव्ही संक्रमणाला बळी पडत असलेली पहावयास मिळते. मानवी भावना या नैसर्गिक असतात. परंतु या भावनांचा उद्रेक म्हणजेच विनाशास निमंत्रण असते. त्यामुळे त्यामध्ये सुवर्णमध्य साधणे आवश्यक असते.तेजस्वीतता, तपस्वीतता, तत्परता हे तारुण्याचे तीन ‘त’ कार आहेत. हे प्रत्यक तरुण–तरुणीमध्ये असले पाहिजेत. परंतु खरोखरच हे तिन्ही गुण आपल्या स्वतः मध्ये आहेत का ? या प्रश्र्नाचे आत्म संशोधन करण्याची आज वेळ आली आहे. कारण नैतिक शिक्षण आवश्यक झालेले आहे. त्यामुळे व्यक्तीला गतिमानता प्राप्त होण्यास मदत होईल. आजचा युवक व्यसनरूपी चक्रव्युव्हामध्ये अडकत आहे. ज्याचे पर्यावसन १५ ते ४९ या वयोगटातील लोकच आज जास्तीत जास्त व्यसनाधीन, एचआयव्ही बाधित पहावयास मिळताहेत.

MAHARASHTRA STATE AIDS CONTROL SOCIETY
MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
www.mahasacs.org
**एड्समुक्त महाराष्ट्र, स्वप्न नव्हे ध्येय!**

एचआयव्ही संक्रमणाला बळी पडण्याचे महत्त्वाचे कारण हे या रोगाबद्दल असलेले अपुरे ज्ञान. तारुण्य अवस्थेतील जल्लोष आहे. त्यामुळे आजच्या युवांनी या आजाराबाबत प्रशिक्षित समुपदेशक, सल्लागार यांच्या मार्फत शास्त्रीय माहिती घेणे आवश्यक आहे. आयसीटीसी केंद्र यामध्ये (दिशा केंद्रामध्ये) येणाऱ्या सर्व व्यक्तींना एचआयव्ही, एड्स बाबत संपूर्ण शास्त्रीय माहिती दिली जाते. तसेच त्यांच्या संमतीनेच त्यांची एचआयव्ही चाचणी केली जाते. चाचणीपूर्व तपासणीमध्ये चाचणी नंतरच्या निष्कर्षाबाबत समोरील व्यक्तीला कल्पना दिली जाते. तपासणीबाबत पूर्णपणे गोपनीयता ठेवली जाते. चाचणी पश्र्चात समुपदेशनामध्ये समोरच्या व्यक्तीच्या मानसशास्त्रीय मुल्याचा अभ्यास करुन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन केले जाते.

तात्पर्य, परिवर्तन हा काळाचा नियम आहे. या चराचर सृष्टीची निर्मिती ज्या निर्मिकाने उदात्त धोरणाने केली, तो उद्देश सफल करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. संस्कृतीचा वारसा आपण जोपासला पाहिजे. परंतु नवीन इंटरनेट, फेसबुक, व्हॉट्सअप च्या संस्कृतीमध्ये आपण आपली जुनी संस्कृती, नितीमुल्य पायदळी तुडवता कामा नये. वाढती फॅशन, अंगप्रदर्शन तसेच संयमहीन जीवन यामुळे आपण आपले अस्तित्वच विसरत चाललो आहोत. खऱ्या अर्थाने युवकांनी एड्समुक्त महाराष्ट्र, भारत स्वप्न नव्हे ध्येय, हे वाक्य खरे ठरवायचे असेल तर वरील सर्व बाबींचा सारासार विचार करायला हवा.महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. या कक्षांतर्गत विविध आयसीटीसी मार्फत युवकांसाठी एचआयव्ही, एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन, शिबिरे, चर्चासत्रे, परिसंवाद, पोस्टर प्रदर्शन इत्यादी उपक्रम, विविध स्पर्धांचे आयोजन वेगवेगळया लक्ष्यगटांमध्ये केले जाते.

यावर्षीचे जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य आहे ढरज्ञश ढहश ठळसहीं झरींह मार्ग हक्काचा, सन्मानाचा ! हे आहे. म्हणजेच एचआयव्ही संसर्गित लाभार्थ्यांना पण सर्व सामान्य नागरिकांसारखे हक्क आहेत, ते वेगळे नाहीत. त्यांना समाजामध्ये सन्मानाची व आदराची वागणूक दिली पाहिजे. सर्व कौटुंबिक सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, नव्हे तो त्यांचा हक्क आहे. यासाठी भारत सरकारने हक्काची जोपासणा करण्यासाठी एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७ अंमलात आणला आहे. ज्या कायद्याद्वारे एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना सन्मानपूर्वक वागणूक प्रदान करण्यात आली आहे. जर कोणी कलंकित करत असेल किंवा भेदभाव करत असेल, तर कायद्याने त्यांना शिक्षा देण्यात आली आहे. यावर्षीच्या घोषवाक्यानुसार एकटे नाहीत तुम्ही साथ आहोत आम्ही ही आम्हीपणाची भावना एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या लाभार्थ्यांच्या मनामध्ये विविध जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून वाढीस लावणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

चला तर मग ०१ डिसेंबर या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये आपण सारेजन सहभागी होऊ या सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊया एचआयव्हीबद्दल अधिक विस्तृत माहितीसाठी १०९७ टोल फ्री क्रमांकावर आपण माहिती विचारु शकता किंवा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, बीड येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा.

**सुहास मनोहरराव कुलकर्णी(जिल्हा आयसीटीसी पर्यवेक्षक) जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, बीड मो.नं. ९४२००१७५३९**

## रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या चित्रकला स्पर्धेचे आज उद्घाटन

लातूर/प्रतिनिधी: रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धे चे उद्घाटन रविवार दि.१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता संपन्न होणार आहे.

श्रीकिशन सोमानी हायस्कूलमध्ये ही स्पर्धा होणार आहे.गतवर्षी आय एफ एस परीक्षेत देशात दुसरा क्रमांक मिळवत मेळघाट व्याघ्र प्रकल्पात परतवाडा येथे सहाय्यक वनसंरक्षक गट–अ पदी रुजू झालेल्या कु.प्रतीक्षा काळे यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न होणार आहे.

श्रीकिशन सोमानी हायस्कूलचे अध्यक्ष डॉ.चेतन सारडा यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या या कार्यक्रमास पाहुणे म्हणून रोटरी ३१३२ चे प्रांतपाल डॉ.सुरेश साबू,सहाय्यक प्रांतपाल नानिक जोधवानी हे उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धा दोन गटात होणार आहे.इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयावर चित्र काढता येणार असून पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दिलेल्या विषयांमधील एका विषयावर चित्र काढावयाचे आहे. स्पर्धे तील विजेत्यांना कुणाल सायकल वर्ल्ड यांच्यामार्फत प्रत्येक वर्गासाठी एक अशा १० आणि मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी २ अशा १२ सायकल बक्षीस म्हणून दिल्या जाणार आहेत.

शहरातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने रोटरीच्या वतीने मागील ३० वर्षांपासून ही स्पर्धा आयोजित केली जाते.स्पर्धे तील यशस्वी विद्यार्थ्यांची चित्रे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर रोटरीच्या मॅक्झिन मध्ये झळकतात. मागील १५ दिवसापासून रोटरी क्लब व रोट्रॅक्ट क्लबच्या सदस्यांनी शहरातील २०० शाळांमध्ये कुपन वाटप केले आहेत. त्यांना श्रीकिशन सोमानी शाळेतील शिक्षक सहकार्य करत आहेत.

शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे आवाहन प्रोजेक्ट चेअरमन रमेश चिल्ले व यश कुलकर्णी यांनी केले आहे

## मुलांनी फुलाप्रमाणे प्रफुल्लित, आनंदी राहावे - न्यायाधीश सुनीता तिवारी

सांगली (जि. मा. का.) :



मुलांनी त्यांच्या भविष्यातील यशस्वी वाटचालीकरिता फुलाप्रमाणे प्रफुल्लित, आनंदी, विवेकी जीवन व्यतीत करावे, असे प्रतिपादन कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश सुनीता तिवारी यांनी केले.

कौटुंबिक न्यायालय सांगली यांच्या वतीने बालसुरक्षा सप्ताह अंतर्गत पक्षकार, वकील वर्ग व कर्मचारी वर्ग यांच्या मुलांकरिता मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते वैभवी प्रेमलता संजय व रोहित वनिता गजानन यांनी मुलांसाठी विविध खेळ व गाणी घेतली. यामध्ये सर्व बालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या कार्यक्रमांतर्गत सर्व सहभागी बालकांसाठी माणुसकीची भिंत या विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाअंतर्गत बालकांसाठी आवश्यक असणाऱ्या विविध वस्तू ठेवण्यात आल्या होत्या. सर्व बालकांना त्यांच्या आवडीच्या अनेकविध वस्तू मिळाल्याने मुले आनंदीत झाली होती.

सूत्रसंचालन कौटुंबिक न्यायालयाच्या विवाह समुपदेशक ज्योती बावले भालकर यांनी केले तर आभार न्यायालयाच्या सहाय्यक अधिक्षक शैलजा वेदपाठक यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न्यायालयाचे कर्मचारी विकास राऊत, संजय लोणकर, महेश खटावकर, सुनीता चौगुले, श्रुती दुधगावकर, शरद चांदवले, तृप्ती फासे आदिंनी परिश्रम घेतले.

# कोणाच्या गळ्याला गळ ?

## संपादकीय...

राष्ट्रीय पातळीवर असो की, राज्यस्तरी पातळीवर असलेल्या भाजपाने सहयोगी पक्षाचा वापर करुन त्यांना संपवीण्याचे कारस्थान आजवर केलेले आहे. ही भाजपाची कुटनीती लपून राहिलेली नाही. कारण महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार असताना भाजपाने कुटनिती वापरुन ठाकरे सरकारला पायउतार केले. त्यात ठाकरे यांचा बदला घेतला असला तरी शरद पवार यांच्या धर्मनिरपेक्ष पुरोगामी विचाराला तडा देवून अजित पवार यांना ही फोडले आणि त्यातून फुटीरतावादी शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले तर शरद पवारांच्या गळ्यातले ताईत अजित पवार यांना गळाला अडकावून उपमुख्यमंत्री पदासह अर्थ मंत्री केले. शिंदे पवारांच्या कर्तबगारी मुळे कालच्या विधानसभा निवडणूकीत भाजपाला भरभरुन यश मिळाले परंतू आज टांग वर करुन देवेंद्र फडणवीस हे दिल्लीस्वराचे नांव घेवून मीच मुख्यमंत्री म्हणून मिरवताना दिसतात. मात्र कोणाच्या गळ्याला गळ लावतो आहे,यातील शहानिशा प्रसार माध्यमातून होताना दिसते आहे.

तत्कालीन मुख्यमंत्र्यानी राजीनामा दिल्यानंतर काळजीवाहू मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे हे अचानक महाराष्ट्राचा कारभार सोडून ऐनवेळी त्याच्या सातारा येथील दरेगावात विश्रांतीसाठी गेले, यातील गौडबंगाल काय असावे, यातून मराठीबाना जागृत होत असेल तर राष्ट्रीय स्वंयसेवक संघ किवा भाजपा नेतृत्वाला हि बाब अव्हाणात्मक असावी अशी कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

आजघडीला केंद्र सरकार असो किंवा राज्य सरकारे असोत त्यात बहुमताच्या बरोबरीने इतर पक्षाना जवळ करुन जे कोणी सत्ताधारी पक्ष सरकार चालवितात, त्यात घटक पक्षाचे डोके दहा आणि सत्ताकारणातील प्रमुख पदावरील टोप्या सहा, हि अवस्था असल्यामूळे कोण कोणाच्या गळ्याला भिडतो आहे, आणि शिकारीचा गळ कोणाच्या गळ्याला बसतो आहे, हि बाब चिंतनीय असली तरी प्रसार माध्यमाना कसरत करावी लागते आहे. कारण काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गाव हे चारीबाजूनी डोंगर असलेल्या सातारा जिल्ह्यातील दरेगांव हे एक खेडे असून तिथं कोणतीही प्रवाशी यंत्रणा नसल्यामूळे होडीने दरेगांवात जावे लागते. त्यामूळे राजकीय नेत्यासह प्रसार माध्यमाला ही चकवा देवून शिंदे अचानक गायब कसे काय झाले आहेत, अशीच उलटसूलट कुजबूज होताना दिसते आहे.

सरकार स्थापन करण्यासाठी संभाव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझा विरोध नाही, ते सरकार स्थापन करु शकतात, त्यात माझी अडकाटी नाही, असे एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या समोर कबुल केले असले तरी ती औपचारीकताच असावी कारण एकनाथ शिंदे यांच्या शब्दाला राष्ट्रीय स्वंयसेवक संघात महत्व प्राप्त झाल्यामूळे आनकी ही शिंदे यांचा मुख्यमंत्री पदाचा दावा बाजूला गेलेला नसावा त्यामूळे कोणाच्या गळ्याला कोण गळ लावतो आहे, हे सांगणे कठीण वाटते.

महाराष्ट्र हा फुले, शाहू, आंबेडकराचा महाराष्ट्र आहे असे सर्वपक्षीय नेते म्हणतात, त्यात जातीयवादी असतील, किंवा धर्मनिरपेक्ष असतील हे सारे एका लाईनीतलेच गधाखोर असले तरी त्यांना फुले, शाहू, आंबेडकरां शिवाय सत्ताकारण, विरोधीकारण करता येत नाही, म्हणून आजघडीला हंगामी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुत्सद्देगीरी कोणाच्याही लक्षात येत नसेल तर मराठी आस्मीतेला साद घालत मुंबई शहर हे केंद्रशासीत करण्याचा डाव भाजपाचा असल्यामूळे त्यातून मुंबईतील धरावी झोपडपट्टी आदानी समुहाला आंदण देण्याचा विचार असल्यामूळे शिंदेना डावलून फडणवीसाना मुख्यमंत्री करण्याचा हेतू सरळपणे दिसतो. परंतू प्रभारी एकनाथ शिंदे यांची मुत्सद्देगीरी कुठपर्यंत चालते आहे, त्यावरच महाराष्ट्र सरकारची स्थापन होण्याची भुमिका अवलंबून असावी यात संदेह नसावा.

कारण असे की, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहिणसह वेगवेगळ्या योजना कार्यरत केल्या, विविध महामंडळे निर्माण करुन जनतेला न्याय दिला, त्यामूळेच महायुतीचा विजय झाला परंतू गरजसरो, वैद्य मरो हीच भावना आरएसएस आणि भाजपाने अवलंबविल्यामूळे कोणाच्या गळ्याला गळ कसा हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो.

# द किंग इज बॅक ......

रात्री नंतर सकाळ होतेच.... अंधारातून मार्ग काढला की प्रकाश दिसतोच मात्र हीच सकाळ आणि प्रकाश पाहण्यासाठी आपल्याकडे हवा तो संयम आणि स्वतःच्या क्षमतेवर असलेला विश्र्वास. जर स्वतःच्या क्षमतेवर विश्र्वास असेल आणि कितीही कठीण काळ आला तरी संयम सोडला नाही तर अपयशाची साखळी तोडून माणूस यशाची शिखरे गाठतोच. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भारताचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज विराट कोहली.

गेली दीड वर्ष विराट कोहली हा अपयशाच्या गर्तेत सापडला होता. धावांची रास उभारणारी विराट कोहलीची बाब त्याच्यावर रुसली होती. शतकाचे इमले उभारणाऱ्या विराटला मागील दीड वर्षात कसोटीत एकही शतक झळकावता आले नाही त्यामुळे त्याच्यावर टीका होऊ लागली. काही महाभागांनी तर त्याला संघाच्या बाहेर ठेवण्याची मागणी केली. स्वतःला क्रिकेटचे तज्ज्ञ म्हणवून घेणारे देखील विराटवर टीका करू लागले. मीडियात देखील विराटवर हल्ला होऊ लागला. विराटचा हरवलेला फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय ठरला होता. विराट मात्र टिकाकरांकडे दुर्लक्ष करून आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करत होता. टिकाकारांच्या टीकेला उत्तर देण्यात त्याने वेळ घालवला नाही तो नेहमी म्हणत असत की मला फक्त एका मोठ्या खेळीची गरज आहे. ती जर आली की मी पुन्हा फॉर्मात येईल कारण त्याचा स्वतःचा क्षमतेवर विश्र्वास होता. त्याला हवी असलेली मोठी खेळी ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पर्थ मधील पहिल्या कसोटीत आली.

पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात विराटने धडाकेबाज नाबाद शतक झळकावले आणि भारताला जुना विराट सापडला. विराट पुन्हा फॉर्मात आला. द किंग इज बॅक....असाच इशारा त्याने या खेळीने जगाला दिला. टी २० विश्र्वचषकातही त्याला म्हणावा तसा फॉर्म सापडला नव्हता मात्र दक्षिण आफ्रिके विरुद्ध महत्वाच्या अंतिम सामन्यात त्याने अविश्र्वसनीय अर्धशतकी खेळी करून भारताला विश्र्वविजय मिळवून दिला मात्र पुन्हा त्याचा फॉर्म हरपला नुकत्याच



झालेल्या बांगलादेश व न्युझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याला धावा काढता आल्या नाहीत मात्र ऑस्ट्रेलिया विरुद्ध त्याने आपल्या शतकी तडाखेबंद खेळीने भारताला एकहाती विजय मिळवून देताना अनेक विक्रमांना गवसणी घातली.

या शतका बरोबरच त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. हे त्याचे कसोटीतील ३० वे शतक आहे. हे त्याचे ऑस्ट्रेलियातील सातवे शतक आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक कसोटी शतक झळकावणारा भारतीय असा विक्रम आता त्याच्या नावावर जमा झाला आहे. पूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता त्याने ऑस्ट्रेलियात सहा कसोटी शतके झळकावली आहेत. विराट कोहलीच्या नावावर आता एकूण ८१ शतक आहेत. कसोटीत ३०, एकदिवसीय सामन्यात ५० तसेच टी २० सामन्यात १ असे एकूण ८१ शतके त्याच्या नावावर जमा झाली आहेत. ८० पेक्षा अधिक शतके झळकावण्याचा पराक्रम करणारा सचिन नंतरचा तो दुसराच खेळाडू आहे. सध्या खेळत असणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. सध्याची कामगिरी पाहता तो लवकरच विक्रमविर सचिन तेंडुलकर यांचा १०० शतकांचा विक्रम लवकरच मोडेल यात शंका नाही.

मागील दीड वर्षाचे अपयश मागे टाकून तो पुन्हा आपल्या जुन्या अवतारात परतला आहे हे भारतासाठी शुभचिन्ह आहे. विराट पुन्हा फॉर्मात आल्याने या वर्षी तो धावांचा रतीब घालणार यात शंका नाही. यावर्षी भारत अनेक मोठ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या मोठ्या स्पर्धेत विराटचा फॉर्म भारताला विजय मिळवून देईन. यावर्षी एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी तसेच विश्र्व कसोटी अजिंक्यपद (ुंल) देखील आहे. जर विराटचा हा फॉर्म असाच राहिला आणि त्याला संघातील इतर खेळाडूंनी साथ दिली तर यावेळी भारत या दोन्ही महत्वाच्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळवेल यात शंका नाही. विराट अजूनही तरुण आहे त्याचा फॉर्म परत आला आहे आणि त्याच्या फिटनेसवर तर शंकाच नाही संघातील सर्वाधिक फिट खेळाडू हा विराटच आहे त्यामुळे तो आणखी तीन चार वर्ष सहज खेळू शकतो या दरम्यान तो सचिनचा १०० शतकांचा विक्रम सहज मोडू शकतो. सचिनचा विक्रम जर कोणी मोडू शकेल तर तो फक्त विराटच आहे कारण आज त्याच्या नावे ८१ शतकांची नोंद आहे. सध्या खेळणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. त्यामुळे सचिनचा विराट विक्रम विराट कोहलीच मोडेल यात शंका नाही.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## गृहमंत्रीपदी डॅशिंग नेता हवा, अर्थखात्याचा कारभारही सक्षम माणसाच्या हातात हवा

मुंबई :राज्याचं मुख्यमंत्रीपद भाजपकडे जाणार असले तर गृहमंत्रीपद आमच्याकडे असावे, हा नैसर्गिक नियम आहे. ते खातं आमच्याकडे असायला हरकत नाही. गृहखात्यावर एखादा डॅशिंग नेता असायला पाहिजे, असे वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी केले. संजय शिरसाट यांच्या या वक्तव्यामुळे एकनाथ शिंदे हे गृहखाते शिवसेनेला मिळण्याबाबत अजूनही ठाम असल्याचे संकेत मिळत आहे. अमित शाह यांच्या निवासस्थानी गुरुवारी रात्री झालेल्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे नाराज झाल्याची चर्चा रंगली आहे. दुसऱ्याच दिवशी एकनाथ शिंदे हे सगळ्या राजकीय घडामोडींपासून अलिप्त होत साताऱ्यातील आपल्या गावी निघून गेले होते. त्यामुळे महायुतीच्या खातेवाटपाची बैठक लांबवणीवर पडली आहे. अशातच आता संजय शिरसाट यांनी शिवसेनेला गृहमंत्रीपद मिळणे, आमचा नैसर्गिक हक्क असल्याचा दावा केला आहे. ते शनिवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

यावेळी संजय शिरसाट यांनी अर्थखात्याबाबतही टिप्पणी केली. जे देतोय ते लोकांपर्यत पोहोचलं पाहिजे ही एकनाथ शिंदे साहेबांची भूमिका आहे. लाडकी बहीण योजना जाहीर करताना अर्थ खात्याने थोडा विरोध केला होता. १५०० ते २१०० करण्यासाठी हिवाळी अधिवेशनात मान्यता मिळाली हवी. या खात्याचा कारभार देखील सक्षम माणसाकडे जायला हवा, असे संजय शिरसाट यांनी म्हटले.

विरोधकांच्या हातात आता सामूहिक आत्महत्या करण्यापलीकडे काहीही उरलेले नाही. एकनाथ शिंदे हे दिल्लीला जाण्यापेक्षा महाराष्ट्रात खास करून गावी दरेला जातात, तिथून आल्यानंतर पक्षासाठी योग्य तो निर्णय घेतात. ईव्हीएमबाबत जे प्रश्न उपस्थित करत आहेत, तो त्यांचा पराभवानंतरचा केविलवाणा प्रयत्न आहे. राम शिंदेबाबत बोलायचं झालं तर कर्जत जाम खेडमध्ये दमदाटीचं राजकारण झालं. शरद पवार ज्या पद्धतीने प्रश्न उपस्थित करत आहेत. एकदा पावसात भिजल्याने सत्ता आली. वारंवार भिजल्याने येतेच अशी नाही, अशी खोचक टीका संजय शिरसाट यांनी केली.

राज्याचा मुख्यमंत्री कोण? याचं उत्तर अद्याप कोणालाच सापडलेलं नाही. मुख्यमंत्री दरे गावी जात असतात. मोठा निर्णय घेण्यासाठी दरेगाव त्यांचं आवडीचं ठिकाण आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी परखडपणे सांगितलं आहे की, सरकार स्थापन करण्यात माझा अडसर नाही. वरिष्ठ नेत्यांचा निर्णय पक्ष आणि मी बांधील असल्याचं स्पष्ट वक्तव्य केलं आहे . दिल्लीतील बैठकीत देखील त्यांनी ते सांगितलं आहे. आता भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घ्यायचा आहे. कोणाला मुख्यमंत्री करावं हा निर्णय मोदी आणि अमित शहा यांनी घ्यावा. का वेळ लागतोय याची कल्पना नाही.

परिवर्तन होत तेव्हा मुख्यमंर्त्याचं नाव जाहीर झाल्यानंतर खातेवाटपावर चर्चा होते. काही विद्वान सरकारवर टीका करत आहेत. अजूनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत, सरकार वाऱ्यावर सोडलेलं नाही. सोमवारी भाजपचे निरीक्षक येणार आहेत, असे समजते. शिंदे का दरेगावला गेले याबद्दल चर्चा करण्याची गरज नाही. आम्ही लाचारसारखं नाटकं करणारी लोक नाही. आमची नाराजी आम्ही उघडपणे जाहीर करु. लाचारीत ज्यांनी अडीच वर्ष घालवली, त्यांच्या टीकेत काही अर्थ नाही, असे संजय शिरसाट यांनी म्हटले.

## प्रवीण बागड़े यांना उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार जाहीर

नागपुर :महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तर्फे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांमधुन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या संचालक, विस्तार शिक्षण विभागातील कार्यरत वरिष्ठश्रेणी लघुलेखक/स्विय सहायक श्री प्रविण मोरेश्र्वर बागडे यांना २०२३–२४ या वर्षाकरीता ‘उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार’ जाहीर करण्यात आला आहे. २५ व्या विद्यापीठ वर्धापन दिनी विद्यापीठ मुख्यालयी आयोजित सोहळयात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कार विद्यापीठ मुख्यालय अधिनस्त घटक महाविद्यालये/प्रक्षेत्रे/संस्थेमधील २०२३–२४ या वर्षाकरीता वर्ग १ व २ संवर्गातून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एक शिक्षकेत्तर अधिकारी, तसेच वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांकरीता प्रत्येकी एक पुरस्कार देऊन सम्मानित करण्यात येणार आहे. सदर पुरस्काराचे उद्दिष्ट म्हणजे विद्यापीठ तसेच विद्यापीठ अधिनस्त घटक महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याची नोंद घेणे, कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सेवा तत्परता व विद्यापीठाप्रती आत्मीयता वाढविणे, कर्मचाऱ्यांमध्ये उत्कृष्ट आणि असाधारण योगदान देण्याची भावना जोपासने व त्यांची कार्यक्षमता वाढविणे असे आहे.

श्री. बागड़े यांनी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्र्वर तालुक्यातील दूधबर्डी येथे २० हेक्टर शासकिय जमीन संपादित करून विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रासाठी शासन निर्णय काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. याआधी त्यांना २०१७–१८ करिता उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. ते महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांकडे स्वीय सहाय्यक म्हणुन कार्यरत होते. शासन आणि प्रशासनाच्या अनुभवासोबतच त्यांना समाजसेवा आणि साहित्याचीही आवड आहे. त्यांनी कोविड अंतर्गत अनेक रुग्णांची सेवा सुध्दा केली असुन त्यांचे महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर २५० वर लेख तसेच १०० वर मुलाखती/स्तंभ सुध्दा प्रकाशित झाले आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेक स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

## जागतिक एड्स दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

मुंबई : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत जागतिक एड्स दिनाचा राज्यस्तरीय कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे ०२ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये एचआयव्ही/एड्स जनजागृतीपर आधारित प्रदर्शन स्टॉल, लोककलापथक सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम, एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींचे मनोगत तसेच जिल्हास्तरावर काम करणाऱ्या जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक यांचा सत्कार इ. कार्यक्रमांचे नियोजन केले आहे.

जागतिक एड्स दिन दरवर्षी ०१ डिसेंबर रोजी पाळला जातो. हा दिवस एड्सबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि एड्समुळे मृत पावलेल्यांना आदरांजली वाहण्यासाठी समर्पित आहे. यावर्षी सन २०२४ ची जागतिक एड्स दिनाची संकल्पना टेक द राईटस् पाथ ही आहे. ही संकल्पना एचआयव्ही/एड्स संसर्गाचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी तसेच मानवी हक्कांचे समर्थन करण्याच्या महत्वावर भर देते.

या कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव–२ नवीन सोना, आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, संचालक आरोग्य सेवा, मुंबई डॉ. स्वप्निल लाळे, संचालक आरोग्य सेवा, पुणे डॉ. नितीन अंबाडेकर, अतिरिक्त प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था डॉ. विजय कंदेवाड, सिनेकलाकार संजय नार्वे कर, श्रीमती कल्याणी मुळे उपस्थित राहणार आहेत.

## सिंधुदुर्ग ते मुंबई विमानसेवा पुन्हा सुरु करा!

मुंबई:मुंबईहून थेट तळकोकणात जाण्यासाठी तीन वर्षासाठी करार पद्धतीने सिंधुदुर्ग ते मुंबई विमानसेवा सुरू करण्यात आली होती. मात्र २६ ऑक्टोबर रोजी मुदत संपल्यानंतर चिपी–मुंबई विमानसेवा बंद करण्यात आली. परंतु लाखो पर्यटकांच्या पसंतीस उतरलेल्या या विम ानसेवेला कोकणवासीयांचा चांगला प्रतिसाद लाभला होता. त्यामुळे खासदार नारायण राणे यांनी ही विमानसेवा पुन्हा सुरु करावी अशी मागणी नागरी विमान वाहतूक मंर्त्याकडे केली आहे.

खा. नारायण राणे यांनी वाहतूक मंर्त्याकडे विमानसेवेबाबत जारी केलेल्या निवेदनानुसार मुंबई – चिपी (सिंधुदुर्ग विमानतळ) अशी कार्यान्वित असलेली सेवा खूप चांगली होती. सणासुदीच्या काळात तसेच अन्य वेळीही मोठा फायदा प्रवाशांना आणि पर्यायाने कंपनीला होत असायचा. हंगामाच्या वेळी तर एका मार्गासाठी २५ हजारापर्यंत तिकीट देऊन प्रवाशांनी प्रवास केला आहे. या दरम्यान कधीकधी हवामान, तसेच अन्य तांत्रीक कारणामुळे विमानसेवा विस्कळीत झाल्याने त्याचा फटका प्रवाशीसंख्येवरही झाला. परंतु फ्लाइट नेहमीच बुक केल्या गेल्या.

पर्यटक, स्थानिक प्रवासी आणि जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेला गती मिळावी यासाठी सिंधुदुर्ग विमानतळावरील सेवा त्वरीत कार्यरत व्हावी, अशी मागणीही खा. नारायण राणे यांनी नागरी विमान वाहतूक मंत्री के.राम मोहन नायडू यांच्याकडे केली आहे.

## इतिहासात आजचा दिवस ०१ डिसेंबर २०२४

आंतरराष्ट्रीय

१९४२ – अमेरिकेत पेट्रोलचो रेशनिंग सुरू झाले

अमेरिकी सैन्याने न्यू गिनीतील गोना बंदरावर ताबा मिळविला.

२००४ – सुरक्षा परिषदेत नव्याने घेण्यात येणाऱ्या सदस्यांना नकारधिकाराचा हक्क देण्यास संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमुख कोफी अन्नान यांचा नाकार.

२००६ – दक्षिण आफ्रिकेत समलिंगी जोडपे कायदेशीर विवाह करु शकतील या संबंधी एका कायद्यावर स्वाक्षरी करण्यात आली.

२००६ – जपानने सुदूर अमेरिका सैनिक शिबीराजवळ जमीनीवरून हवेत मार करणाऱ्या संरक्षण क्षेपणास्त्र 'चु–साम'ची यशस्वी चाचणी केली.

राष्ट्रीय

१९३३ – कलकत्ता–ढाका येथे पहिली विमानसेवा सुरू

१९३८ – माधव ज्युलियन यांच्या 'छदोरचना' या ग्रथास मुंबई विद्यापीठाची डी. लिट्.ची पदवी देण्यात आली.

१९६२ – नागालँड भारताचे १६ वे घटक राज्य वनले.

१९८१ – भारताची दुसरी अंटार्क्टिक मोहीम १२ शास्त्रज्ञांसह पणजीहून निघाली.

२००७ – लोकसभेचे वरिष्ठ पत्रकार हरीशचंद्र बिष्ट यांनी ३९ व्या आखिल भारतीय हिंदी आशुलिपी स्पर्धेत २६० शब्द प्रति मिनिटाचा एक नवीन विश्वविक्रम केला.

२००७ – ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू यांच्या रूपवेध प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा तन्वीर सन्मान केरळ येथील ज्येष्ठ रंगकर्मी, कवी, नाटककार आणि दिग्दर्शक कावालम नारायण पणिक्कर यांना जाहीर करण्यात आला.

२००८ – आसामात बर्ड फ्लू विषाणू पसरल्यानंतर ४,००० कोंबड्यांची कत्तल करण्यात आली.

जन्म

१८८५ – गांधीवादी आचार्य काका कालेलकर यांचा जन्म

१९०९ – मराठी कवितेस ने वळण देणारे बा.सी मर्ढेकर यांचा जन्म

१९८० – भारतीय क्रिकेटपटू मोहमद कैफचा जन्म.

निधन

१९३५ – वर्नहार्ड श्मिड या खगोलशास्त्रज्ञाचे निधन.

१९६४ – जे. भी. एद्रा टाल्डेन या भारतात स्थायिक झालेल्या शास्त्रज्ञाचे निधन.

१९७२ – मेलषव्हल मॅकेंझी या वैद्यकीय शास्त्रज्ञाचे निधन ते जागतिक आरोग्य संघटनेचे प्रमुख होते.

१९७३ – इस्त्राईलचे पहिले पंतप्रधान व शास्त्रज्ञ डेव्हिड बेनगुरियन यानचे निधन.

१९८८ – प्रा.गं.बा. सरदार यांचे निधन.

# आपण वेळीच सावधान होवून काम केलेले बरे?

दि. वीस तारखेला तारखेला निवडणूक पार पडली पडली व त्याचा निकालही आला. निकालानुसार भाजप व मित्रपक्ष मोठ्या फरकाने जिंकले. तसेच महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. मग प्रतिक्रियेचा पाऊस पडला पडला. भाजपवाले स्वत:ला शेर समजत प्रतिक्रिया देवू लागले. त्यातच एका मोठ्या नेत्यानं एका वाहिनीवर म्हटलं, 'आमच्या लाडक्या लाडक्या बहिणींनी आपल्या सावत्र भावाला जोडा मारला.' अशी प्रतिक्रिया. प्रतिक्रिया तशा भरपूर आल्यात. ज्यात कोणी म्हणत होतं, 'आमच्यावर आमच्या लाडक्या बहिणींनी विश्वास ठेवला.' तर कोणी म्हणत होतं की आमच्या लाडक्या बहिणींनी त्यांना धडा शिकवला.' तर कोणी म्हणत होतं, 'आम च्या बहिणींनी विकास पाहिला.'ङ दि. वीस तारखेला तारखेला निवडणूक पार पडली पडली व त्याचा निकालही आला. निकालानुसार भाजप व मित्रपक्ष मोठ्या फरकानं जिंकलं. तसंच महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. मग प्रतिक्रियेचा पाऊस पडला पडला. भाजपवाले स्वत:ला शेर समजत प्रतिक्रिया देवू लागले. त्यातच एका मोठ्या नेत्यानं एका वाहिनीवर म्हटलं, 'आमच्या लाडक्या लाडक्या बहिणींनी आपल्या सावत्र भावाला जोडा मारला.' अशी प्रतिक्रिया. प्रतिक्रिया तशा भरपूर आल्यात. ज्यात कोणी म्हणत होतं, 'आमच्यावर आमच्या लाडक्या बहिणींनी विश्वास ठेवला.' तर कोणी म्हणत होतं की आमच्या लाडक्या बहिणींनी त्यांना धडा शिकवला.' तर कोणी म्हणत होतं, 'आमच्या बहिणींनी विकास पाहिला.

महायुतीकडून या संदर्भात जशा प्रतिक्रिया आल्या. तशाच प्रतिक्रिया या महाविकास आघाडीतील काही समर्थक असलेल्या साम ान्य सामान्य लोकांकडून आल्या. ज्यात म हिलांची अक्कल घुटन्यात असते, असे म्हणत होते व ते म्हणत असतांना त्यांची कीव येत होती. त्याचं कारण आहे, महिलांनी आतापर्यंत केलेल्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती. एक महिला असलेल्या इंदिरा गांधींनी देश चालवला. एक महिला असलेली कैसर विल्यम अंतराळात गेली आहे. एक महिला असलेली ताराबाई औरंगजेबाशी विरश्रीनं लढली आणि एक महिला असलेल्या जिजाऊनं शिवबा घडवला. एवढंच नाही तर सावित्रीबाई फुलेंनी शिक्षणाची गंगा सर्व स्त्रियांपर्यंत पोहोचवली. तिही एक स्त्रीच होती. अशा बऱ्याच स्त्रिया आहेत की त्यांनी आतापर्यंत कितीतरी कामं केली व आपली नावे अजरामर केलीत केलीत. तरीही आजचीही मंडळी स्त्रियांची अक्कल काढत सुटतात. म्हणतात की स्त्रियांची अक्कल घुटन्यात असते. हा घुटना म्हणजेच गुडघा होय. ही पहिली प्रतिक्रिया. दुसरी प्रतिक्रिया आली, ती म्हणजे चिन्हांचा संभ्रम. काही लोकं म्हणत होते की चिन्हं आम्हाला कळलंच नाही. आम्ही घड्याळ चिन्हाला शरद पवारांचीच घड्याळ समजत होतो. आम्हाला तुतारी समजलीच नाही. नाही तर आम्ही तुतारीलाच मतदान केलं असतं. तेच शिवसेनेच्या धनुष्यबाणाबद्दलही घडलं. सारखी तीच प्रतिक्रिया. काही म्हणत होते की आम्ही धनुष्यबाणाला उद्धव ठाकरेंचं बाण समजलो. त्यामुळंच धनुष्यबाणालाच मतदान केलं. काहीजण म्हणत होते की आम्हाला दोन्ही चिन्हं दिसले नाहीत. म्हणून आम्ही कम ळाला मतदान केलं. त्यातच काही म्हणत होते की न्यायालयानं दोघांनाही वेगवेगळी चिन्हं द्यायला हवी होती. म्हणजे एवढा फरक दिसला नसता. यावर उत्तर देतांना कोणीही म्हणू शकेल की जनता काय एवढे दिवस झोपून होती काय की त्यांना चिन्हं कळलेच नाही. अन् जनता काय एवढी अज्ञाणी आहे काय की त्यांना चिन्हं कळत नाही. त्यातच त्यांना जरी चिन्हं वेगवेगळे मिळाले असतील तरी त्यांनी आपलं चिन्हं मतदारांना व्यवस्थीत पटवून का दिलं नाही? त्यामुळंच वरील प्रतिक्रिया योग्य वाटतच नाही.

या दोन प्रतिक्रिया. त्यातच तिसरी प्रतिक्रिया आली नव्हे तर ते नेहमीचं तुणतुणं आहे. जे म्हणणं म्हणजे इव्हीएम मशीन मध्ये सेटींग केली, हॅक केली. असं ते म्हणणं. ते तर तुणतुणंच असतं. तरीही निवडणूक यंत्रणेनं निवडणूक पारदर्शक करण्यासाठी मॉकपोल यंत्रणा ठेवली. त्यातच व्हि व्हि पॅट योजना ठेवली. ज्यात आपण कोणाला मतदान केलं, ते आपल्याला दिसतं. एवढंच नाही तर आता कोणताच घोळ होवू नये म्हणून मतदान कक्षात सी सी टि व्ही कॅमेरेही बसवले. तरीही इ व्हि एम हॅक केल्या गेली हे लोकांचं सारखं तुणतुणं. ते कधीच आपल्या डोक्यातून जाणार. हे कळत नाही. शिवाय पराभव झाल्यावर असे प्रश्न येणारच. लोकंच नाही तर विरोधकच ते. ते तर,काही बाही म्हणणारच. आपणही तसे काही कमी नाही बोलायला. आपणही बोलतोच. परंतु जिंकलेल्या लोकांनी मात्र त्यांचेवर प्रतिक्रिया देवू नये. कारण तशी प्रतिक्रिया दिल्यास वाद तयार होतात.

विशेष म्हणजे प्रतिक्रिया या असणारच. चांगल्या व वाईटही. कधी सामान्य लोकांकडून तर कधी नेत्यांकडूनही. जिंकलेल्यांच्या प्रतिक्रिया वेगळ्याच व हरलेल्यांच्या प्रतिक्रिया वेगळ्याच. तेव्हा जिंकलेल्यांनी कोण काय बोलतोय यांचा विचार करु नये. त्यांना जनतेनंच धडा शिकवलाय. हे निकालातून दिसलं. ते दु:खच आहे. महादु:ख. तेव्हा त्या गोष्टीचा विचार न करता व ती गोष्ट मनात न ठेवता जिंकलेल्यांनी त्यांनाही आपलाच भाऊ समजावं व चिडीचं राजकारण करु नये. त्यांच्यासाठी वेगळ्याच अशा विशेष प्रतिक्रिया देवू नये. कारण हारजीत व पराभव चालतच राहणार. कोणी पप्पू म्हणणार तर कोणी खरबुजा म्हणणार. कोणी स्त्रियांची अक्कलही काढणार. कोणी इव्हीएमवर शंका घेणार. कोणी चिन्हांवर आक्षेप नोंदविणार. ते सगळं विसरुन सरकारनं जनतेसाठी कामं करावीत. जनतेनं तुम्हाला निवडून दिलंय ना. मग ज्या लाडक्या बहिणीनं तुम्हाला निवडून दिलं. तिची तुम्हाला काळजी घ्यावी लागेल. तिला कोणताही त्रास होवू नये याची. तिला त्रास कोणता असणार? यावर विचार करतांना एवढंच सांगता येईल की तिची चूल ज्या गोष्टींवर अवलंबून असते. त्या सिलेंडरचे दर व मसाला आणि तेलाचे दर तुम्हाला कमी करावे लागेल. दुसरं काम म्हणजे ज्या शेतकऱ्यांनी तुम्हाला निवडून दिलं, तो शेतकरी आत्महत्या करणार नाही, याचा विचार तुम्हाला करावा लागेल. त्यासाठी खते व बी बियाण्याच्या किमती तुम्हाला कमी कराव्या लागतील. त्यातच त्यांच्या शेतातील निघणाऱ्या मालाला योग्य भाव द्यावा लागेल. तिसरं काम म्हणजे ज्या युवकांनी तुम्हाला निवडून दिलंय. त्या युवकांसाठी तुम्हाला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन द्यायला हव्यात. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात निदान पाच तरी मोठमोठे उद्योग ग्रामीण तसेच शहरी भागात उभे करावे लागतील. चवथं काम म्हणजे ज्या वयोवृद्ध लोकांनी तुम्हाला निवडून दिलंय. त्यांच्या आरोग्यासाठी व उपचारासाठी तुम्हाला रुग्णालय तेही नि:शुल्क स्वरुपात उभे करावे लागतील. या व्यतिरीक्त तुमची लाडकी बहिण सुरक्षीत असायला हवी म्हणून पोलीस ठाणे उघडावे लागतील. कोणीही केव्हाही, रात्री अपरात्री तिच्यावर बलात्कार करणार नाही यासाठी आणि सर्वात महत्वाचं म्हणजे ज्या सामान्य, गरीब लोकांनी तुम्हाला मतदान केलं त्यांच्या मुलासाठी तुम्हाला नि:शुल्क शिक्षणाची व्यवस्था करावी लागेल. मगच तुम्हाला पुढील काळातही ही जनता अशाच स्वरुपाच्या भरघोष मतानं निवडून देईल. कारण आता बरेचसे लोकं चूक मंजूर न करता म्हणत आहेत की आम्हाला चिन्हं समजलेलं नाही. मात्र पाच वर्षानं त्यांना चिन्हं समजेलच. मग तुम्ही जर काम केलं नाही तर कदाचीत चिन्हं माहीत झाल्यानं लोकं डोळस होवू शकतात. ते नक्कीच विचार करु शकतात की तुम्ही किती कामं केलीत. त्यातच कामानुसार ते तुम्हाला नक्कीच जागाही दाखवू शकतात. मात्र तुमचं जर काम असेल तर तुम्ही तरुन जालं. नाहीतर नक्कीच मागं पडाल. त्यानंतर पश्चातापाची वेळ नक्कीच येवू शकते. असं होवू नये म्हणून आज जी संधी आपल्याला मिळालेली आहे. जनतेनं ती संधी आपल्याला दिलेली आहे. त्या संधीचं आपण सोनं करावं. जनता आजच्यासारखी आपणाला कधीच विसरणार नाही. अन् आपण काम न केल्यास हीच जनता आपल्याला नेस्तनाबूत करायलाही मागेपुढे पाहणार नाही. कारण ही जनता आहे जनता. तेव्हा वेळीच सावधान होवून काम केलेलं बरं.

**अंकुश शिंगाडे**
**नागपूर**
**९३७३३५९४५०**

# आजची पिढी जेव्हा संघर्ष करते तेव्हा उद्याची पिढी सन्मानाने जगते.

विधानसभा निवडणुकीत या निष्ठावंत समाजाने सर्वच आंबेडकरी नेत्यांना नाकारले त्याच पद्धतीने त्यांनी राजकिय सत्ता स्पर्धेत स्वताची राजकीय शक्ति दाखवणाऱ्या एड प्रकाश आंबेडकर यांच्यावर ही विश्र्वास दाखवला नाही.त्यामुळे चैत्यभूमीवर गर्दीचा उंचाक मोडणारे निष्ठावंत भिमसैनिक,भिम अनुयायी,भिमभक्त मतदान पेटीत आपली संख्या दाखवण्यास कमी पडला.न्याय,हक्क,अधिकार गर्दी करून मिळत नाही. मतदान करून मिळवता येतात.आजची पिढी जेव्हा संघर्ष करते तेव्हा उद्याची पिढी सन्मानाने जगते. आजची पिढी जेव्हा लाचार होते तेव्हा उद्याची पिढी गुमाल बनते. आता तुलना करा विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाची.भारतात नव्हे तर जगात असा स्मृती दिन कोणाचा साजरा होत नसेल.त्यांची गिनिज बुकात नोंद होत असते.

चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क परिसरात फिरत असताना लोकांकडे पाहून एक प्रश्र्न सारखा सतावत असतो?.कोण ही माणसं?.कशाची पर्वा न करता का ही माणसे येतात?.भव्य मंडपात राहायला मिळते, झोपायला जागा मिळते.स्वयंसेवी संस्था, संघटना जागोजागी मोफत भोजनदान करतात.त्यामुळे खायला भरपूर मिळते,म्हणून चैत्यभूमीची ओढ का आहे? तर बिलकुल नाही.एकच जिद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र स्मृती स्मारकाला चैत्यभूमीला माथा टेकवून वंदन करणे,अभिवादन करने. लहान बालकं,तरुण मुले–मुली,वयोवृद्ध बाई माणसं जिवाची पर्वा न करता खेड्या पड्यातून झुंडीच्या झुंडीने येतात.शहरातील सुशिक्षित सुरक्षित ठिकाणी जात लपवून राहणारे चैत्यभूमी दादरला येतांना शंभर अडचणी सांगतात.त्यातील बहुसंख्य लोक पांच डिसेंबर रात्रीच सफेद वस्त्र परिधान करून अभिवादन करण्यासाठी येतात. म्हणजे दिवसा कोणी ओळखीवाला भेटू नये.त्याच बरोबर सहा डिसेंबरला कामावर हजर राहून आम्ही त्यातले नाही. हे दाखविण्याचा खोटा अहंकार,पण कागदावर जात लपविता येत नाही.जातीच्या सवलती घेण्यासाठी सर्वात पुढे आणि वैचारिक निष्ठा नाही म्हणूनच मी म्हणतो माझा असंघटित शेतमजूर,कामगार कर्तृत्ववान नसला तरी निष्ठावंत आहे.मग शिक्षण घेतांना नोकरीवर लागताना सवलत घेणारा कर्तृत्ववान नसला तरी चालले पण निष्ठावंत पाहिजे.खेड्या पाड्यातील हा असंघटित शेतमजूर शिवाजी पार्कला आजूबाजूच्या रस्त्यावर झोपायला जागा नसली तरीही अस्तव्यस्त पडलेला असो. अंथरुण अन पांघरुणही नाही.कडाक्याची थंडी शौचालयाची अपुरी व्यवस्था.कशाची चिंता न करतात हा दोन दिवस चैत्यभूमी शिवाजी पार्क परिसरात राहून रात्रभर जागून काढतो.त्यात भिमगिते गाणारे. पुस्तके,फोटो,मुर्त्या,कॅलेंडर यांचे स्टॉल पाहणी करून खरेदी,विक्री करणारे सर्वच असंघटित आहेत.ते कर्तृत्ववान नसले तरी दोन दिवसासाठी निष्ठावंत भिम अनुयायी,भिम सैनिक भिम भक्त म्हणून नोंद घेण्यास भाग पडतात.

देशभरातुन आलेला निष्ठावंत भिमसैनिक,अनुयायी कोणाच्या सांगण्यावरून मुंबईतील दादर चैत्यभूमीला येत नाही.इथे आल्यावर तो प्रथम बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर नतमस्तक होतो,समुद्राच्या वाळूत बनविलेल्या शिल्पा समोर हारफुल मेणबत्ती,अगरबत्ती अर्पण करून त्रिवार वंदन करून वंदना म्हणतो.नंतर तो त्यांच्या आवडी नुसार सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,धार्मिक आणि राजकीय नेतेच्या सभामंडपा समोर हजेरी लावतो.कर्तृत्ववान नसले तरी पण निष्ठावंत म्हणून त्यांची नोंद घेतलीच पाहिजे. तसेच नेते सुध्दा आहेत.असंघटित कष्टकरी शेतमजूर,इमारत बांधकाम कामगार,नाका कामगार,घरकामगार, कचरा वेचक,फेरीवाला यांच्या न्याय हक्कासाठी लढणारे अनेक कार्यकर्ते आहेत.तेच या लोकांच्या संकट समयी उपयोगी पडतात. तेच कार्यकर्ते कोणत्यानां कोणत्या नेत्यांचे निष्ठावंत असतात.मग हेच कार्यकर्ते या असंघटित शेतमजूरांना कामगारांना यांच्या दावणीला बांधतात.म्हणूनच सहा डिसेंबरला चैत्यभूमी दादरला येणार हा असंघटित शेतमजूर कामगार दरवर्षी कमी होण्या ऐवजी तीन चार पटीने वाढत आहे.त्याला आज पर्यत अनेकांनी फसविले आहे.पण बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे त्याला न्याय हक्क मांगण्याचा अधिकार आहे. हे जो जाणतो तो अन्याय,अत्याचार सहन करून पुन्हा पुन्हा संघर्षाची लढाई लढण्यासाठी सज्ज होतो.

गुजरात,राजस्थान आणि बिहारच्या मागासवर्गीय समाजाच्या लोकांनी खूप मार खाल्ला त्यांच्या समर्थनात देशभरातील मागासवर्गीय विशेष आंबेडकरी चळवळीतील लोक उभे राहिले,त्यामुळेच कधीच मुंबईतील चैत्यभूमी न पाहिलेले गुजरात,राजस्थान, आंध्रप्रदेश,कनटिक,छत्तीसगड,उत्तरप्रदेश आणि बिहारच्या मागासवर्गीय समाजाची संख्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रीय स्मारक चैत्यभूमी पाहण्यासाठी लाखोंच्या संख्येने वाढत आहे.आता पर्यत त्यांनी देवाच्या देवीच्या जत्रा पाहिल्या होत्या जेव्हा दादरच्या शिवाजी पार्कची बुक स्टोल,भोजनदान करणारे,विविध बँका,रेल्वे, माझगाव डॉक,कामगार कर्मचारी युनियन चे मंडप पाहिले तेव्हा खूप प्रमाणात प्रभावीत झाला.आणि आजूबाजूच्या परिसरातील फुले शाहू,आंबेडकर विचारांचे विविध साहित्य,मुर्त्या फोटो,पेन,दिनदर्शिका,टी शर्ट,टोप्या त्या खरेदी करताना बहुसंख्येने असंघटित कष्टकरी माणसं हे नवीन माणसासाठी खूप प्रेरणादायी ठरते.ही प्रेरणा घेऊन तो आपल्या गावी जातो,तेव्हा त्याने जे पाहिले त्यांच्या पेक्षा जास्त सांगतो. म्हणूनच महाराष्ट्राच्या खेड्या पाड्यातील असंघटित माणसा पेक्षा इतर राज्यातील असंघटित मागासवर्गीय समाज मोठया संख्येने उपस्थित होऊन तीन चार दिवस भारावून जातो.तेव्हाच तो ठरवितो, मी या पुढे दरवर्षी चैत्यभूमी दादरला माझ्या समाज बांधवांना जास्तीतजास्त संख्येने घेऊन येईल.आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक दाखवेल.म्हणूनच माणसं कर्तृत्ववान नसले तरी चालतील पण निष्ठावंत पाहिजे असे लिहावे लागते.

शिवाजी पार्क दादरला केवळ आंबेडकरी चळवळीतील माणूसच येतो असे म्हणणे चूक ठरेल.या लोकांची गर्दी पाहण्यासाठी त्यातील ऊर्जा शक्ती पाहण्यासाठी अनेक दिग्गज पत्रकार,साहित्यिक,विचारवंत येतात.अनेक पुस्तक स्टोल्सनां भेटी देतात, पुस्तके,ग्रंथ खरेदी करतात.आणि म्हणतात खरच या गोरगरीब कष्टकरी लोकांची खूप निष्ठ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर आहे.काय मिळतं म्हणून येत नाही,तर आयुष्यात जे जे मिळालं ते ज्या महामानवामुळे मिळालं त्याला अभिवादन करण्यासाठी किती ही त्रास झाला,तरी आम्ही अभिवादन करण्यासाठी येणारच!.असे पुण्यकर्म करणारा माणूस देशात नव्हे जगात झाला नाही. स्वाभिमानी माणसं निर्माण करणारा युगपुरुष जगात दुसरा कुणी झाला नाही अन होणारही नाही.करोडों गोरगरीब जनतेच्या मनात बसलेला जगातील सर्वात श्रीमंत महामानव आपला बाप आजही आपली श्रीमंती टिकवून आहे.त्यांच्या नंतर किती स्वयंघोषित हिंदू हृदय सम्राट आले त्यांच्या स्मृती दिनाला माणसं फक्त राजकीय फायदा घेण्यासाठी फोटो घेण्यासाठी येतात आणि जातात.अनेकांनी सांगितले व लिहले होते की चैत्यभूमीवर गर्दीचा उंचाक मोडून काढणार.एकच नेता देशातील तमाम हिंदूंच्या मनावर अधिराज्य गाजवितो,पण काय झाले?. पहिल्याच वर्षी हजारो,दुसऱ्या वर्षी शेकडो लोकांनी स्मृतिदिन आठवणीत ठेऊन साजरा केला,तिसऱ्या वर्षी राज्यात देशात मनुस्मृती नुसार वागणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांचे पक्षाचे लोक सत्ताधारी असतांना ही फारसा बदल झालेला नाही. काय झाले असेल?. कर्तृत्ववान असलेल्या तमाम सहा हजार सहाशे जाती पोटजातीत विभागलेल्या ज्वलंत हिंदुत्ववादी लोकांनी निष्ठावंत सैनिक म्हणून निष्ठा का नाही दाखविली?.हजारो गटात,संस्थेत संघटनेत आणि राजकिय पक्षात विभागलेला हा गोरगरीब कष्टकरी असंघटित समाज बाबाचे उपकारांची जाणीव ठेवून दरवर्षी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहतो.बाबा तुमचे ऋण आम्ही फेडू शकत नाही. असे मान्य करून नतमस्तक होतो.

६८ वर्षा नंतर ही सैनिकात,अनुयायात,भक्तात,शिष्यात,पत्रकारात,साहित्यिकात, विचारवंतात मोठी भर पडत चालली आहे.म्हणूनच मी दरवर्षी आत्मचिंतन व आत्मपरीक्षण करून या महामानवाच्या महापरिनिर्वाण दिना निमित्ताने सहा डिसेंबर आणि आठ डिसेंबर नंतर लिहतो.या लक्षवेधी गर्दीवर,करोडो रुपयांच्या पुस्तक,मूर्ती, फोटो आणि प्रेरणादायी साहित्य निर्मितीसाठी पैसा टाकून तीन दिवसांत वसूल करणाऱ्या लोकांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. म्हणूनच आंबेडकरी चळवळीतील गोरगरीब कष्टकरी असंघटित समाज कोणत्याही क्षेत्रात पुढे गेला नसेल पण तो कोणत्याही क्षेत्रात मागे ही नाहीत.ते अपेक्षा पेक्षा कर्तृत्ववान व निष्ठावंत आहेत.फक्त त्यांचा कोणाचा कोणाला एकूण हिशोब नाही,ऑडिट रिपोर्ट नाही. खरच या लोकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेले भारतीय संविधान वाचले आणि त्यांची प्रामाणिक पणे अंमलबजावणी केली तर काय होईल?.मग कोणी म्हणेल कर्तृत्ववान नसले तरी चालतील पण निष्ठावंत पाहिजे.विधानसभा निवडणुकीत या निष्ठावंत समाजाने सर्वच आंबेडकरी नेत्यांना नाकारले त्याच पद्धतीने त्यांनी राजकिय सत्ता स्पर्धेत स्वताची राजकीय शक्ति दाखवणाऱ्या एड प्रकाश आंबेडकर यांच्यावर ही विश्र्वास दाखवला नाही.त्यामुळे चैत्यभूमीवर गर्दीचा उंचाक मोडणारे निष्ठावंत भिमसैनिक भिम अनुयायी मतदान पेटीत आपली संख्या दाखवण्यास कमी का पडला.आंबेडकरी विचारांची आजची पिढी जेव्हा संघर्ष करते तेव्हा उद्याची पिढी सन्मानाने जगते.आजची पिढी जेव्हा लाचार होते तेव्हा उद्याची पिढी गुमाल बनते.यांचे आत्मचिंतन परीक्षण येणाऱ्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी झाले पाहिजे.लोकसभा विधानसभा निवडणुकीत एड.प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीची लक्षवेधी भूमिका ठरत होती.तिच्या बदल खोटा प्रचार करण्याचे काम सोन्याचे,चांदीचे,स्टीलचे चमचे बुद्धिजीवी विचारवंत,साहित्यिक,संपादक,लेखक,सेवानिवृत अधिकारी,सुरक्षित नोकरी करणारा आरक्षणचा लाभार्थी अशी मंडळी इमानदारीने करीत होती हे आपण सोशल मिडियावर वाचले व पाहिले असेलच.२३ नोव्हेंबर २०२४ च्या निकालाने सर्वांचे दात पडले आणि तोंड काळे केले. आता त्यांचे काय केले पाहिजे.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप मुंबई.**

# स्वत:च्या फायद्यासाठी देहविक्रय करून घेणाऱ्या महिलेला अटक, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई !

लातूर (पोअका) : पोलीसांना गोपनीय माहिती मिळाल्यानुसार, लातूर शहरातील बार्शी रोड परिसरामध्ये एक महिला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरून स्त्रियांना बोलावून घेऊन डायमंड स्पा च्या नावा खाली त्यांच्याकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेत आहे.

माहितीची खातरजमा केल्यानंतर सदरची बाब खरी असल्याचे निदर्शनास येताच दिनांक २७/११/२०२४ रोजी पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे ,अप्पर पोलीस अधीक्षक श्री.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती बबिता वाकडकर यांच्या नेतृत्वात एएचटीयु पथकाने बनावट ग्राहक पाठवून मिळालेल्या माहितीची सत्यता पडताळून ती खरी असल्याचे निदर्शनास येताच लातूर शहरातील बार्शी रोड परिसरातील डायमंड स्पा वर छापा मारला



त्याठिकाणी देहविक्री करीत असताना दोन पिडीत महिला व वेश्या व्यवसाय करून घेणारे एक महिला आढळून आले. तसेच पिडीत महिलांकडून देहविक्रय व्यवसाय करून घेणारे, स्वतःच्या फायद्यासाठी बाहेर गावाच्या महिलांना स्वतःचे स्पा मध्ये ठेवून त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून स्पा च्या नावाखाली वेश्या व्यवसाय करून घेतात व आम्हाला काही रक्कम देऊन आमची राहण्याची खाण्यापिण्याची व्यवस्था करतात असे पीडित महिलांनी सांगितले.

सदर प्रकारा बाबत पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर नंबर ८४०/२०२४ कलम १४७ भारतीय न्याय संहिता व ३, ४, ५, अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून कुंटणखाना चालणाऱ्या महिलेला अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्रीमती बबिता वाकडकर, पो.उपनि. शामल देशमुख, सुभाष सूर्यवंशी, पोह. सदानंद योगी,प्रकाश जाधव,मपोह. सुधमाती यादव, निहाल मनियार सर्व ने. आनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पथकाने केली आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी चे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे करीत आहेत.

# महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा मुहूर्त ठरला; ५ डिसेंबरला दुपारी १ वाजता, ठिकाणही निश्चित

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकांचा निकाल लागून आता ८ दिवस झाले, पण अद्यापही सरकार स्थापन झाले नाही. विशेष म्हणजे भाजप महायुतीला २३७ जागांसह मोठं बहुमत मिळालं आहे. त्यामध्ये, भाजपने १३२ जागांवर विजय मिळवला असून शिवसेना शिंदे गटाला ५७ जागा जिंकता आल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ४१ जागा जिंकल्या असून सध्या तिन्ही पक्षांच्या बैठकांचा धडाका सुरू आहे. दिल्लीत महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठक झाल्यानंतर काळजीवाहू मुख्यमंत्री आणि शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे हे आपल्या गावी गेले असून भाजप नेते पक्षाच्या पदाधिकारी व आमदाराच्या बैठकी घेत आहेत. त्यामुळे, महायुतीच्या मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण याचे उत्तर अद्याप मिळालेलं नाही. मात्र, महाराष्ट्राच्या ३१ व्या मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता होणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही या वृत्ताला दुजोरा दिला आहे. भाजप नेते देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे व महायुतीचे मुख्यमंत्री होतील, असा अंदाज राजकीय विषक वर्तवत आहेत. तर, दिल्लीच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांचेच नाव निश्चित झाल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यासाठी, भाजपकडून मुख्यमंत्रीपदाचा चेहरा २ डिसेंबर रोजी स्पष्ट होणार आहे. भाजपचा गटनेता २ डिसेंबरला निवडला जाणार असून दुपारी १ वाजता विधानभवनात गटनेता निवडीसाठी भाजपची बैठक होणार आहे. या बैठकीला भाजपचे सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, महायुतीतील सर्वच मित्र पक्षांच्या गटनेत्यांची निवड झाल्यानंतर आता भाजपचा गटनेता कधी निवडला जाणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. त्यामुळे, भाजपचा गटनेता म्हणून कुणाची निवड होईल याची देखील राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. दुसरीकडे राज्याच्या मुख्यमंत्रीपपदाच्या शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू झाली आहे. ५ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता मुंबईतील आझाद मैदानावर हा शपथविधी सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री व बडे नेते उपस्थित राहणार असल्याचे समजते. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही वेळापूर्वी भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची ऑनलाईन बैठक घेतली. त्यामध्ये, भाजपच्या आमदारांनी सरकार स्थापनेपूर्वी आणि स्थापनेनंतर काय–काय काळजी घ्यायची यासंदर्भात या बैठकीत मार्गदर्शन करण्यात आलं आहे. ५ डिसेंबर रोजी होणाऱ्या शपथविधीला उपस्थित राहण्याच्या सूचना सर्व आमदारांना देण्यात आल्या आहेत. तसेच, महायुती सरकारचा शपथविधी होत असताना आपापल्या जिल्ह्यांमध्ये जल्लोष करण्याचे देखील बावनकुळे यांनी सांगितले. यासह प्रत्येक जिल्ह्यातून भाजपचे महत्त्वाचे पदाधिकारी शपथविधीला उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

# नैसर्गिकरित्या दूर होईल पिंपल्सची समस्या, करून पहा फक्त हे घरगुती उपाय

पिंपल्स किंवा मुरुमे येणे सामान्य गोष्ट आहे, पण त्यामुळे चेहऱ्याच्या सौंदर्यावर डाग पडतात. मुरुम दूर करण्यासाठी, आपण अनेक पद्धती वापरून पाहतो, ज्यामध्ये महागड्या उत्पादनांपासून ते घरगुती उपचारांचा समावेश होतो. मुरुम किंवा पिंपल्सवर उपचार न केल्यास ते डागांचे रूप धारण करतात. त्वचेवरील छिद्रांमध्ये घाण आणि तेल जमा होते आणि ते हळूहळू मुरुमांचे रूप घेतात. ते मिटवता येत नाहीत पण पिंपल्स नक्कीच कमी करता येतात.

बरं काही स्किन केअर हॅक मुरुम दूर करू शकतात. जर तुम्हाला रासायनिक पदार्थांऐवजी घरगुती उपायांनी मुरुम दूर करायचे असतील तर या पद्धती वापरून पहा.

जर तुम्हाला मुरुमांच्या समस्येपासून नैसर्गिकरित्या मुक्ती मिळवायची असेल, तर अँटी–इफ्ता सामग्री आणि प्रतिजैविक



गुणधर्मांसह समृद्ध एरंडेल तेल लावा. उन्हाळ्यात मुरुमांचा त्रास होतो आणि त्यामुळे त्वचेवर सूज येते. नैसर्गिक गुणधर्मांनी समृद्ध एरंडेल तेल ही जळजळ कमी किंवा दूर करण्याचे काम करते.

संशोधनानुसार, सूक्ष्मजीव बॅक्टेरिया देखील मुरुमांच्या कारणांपैकी एक मानले जातात. कोरफडीमध्ये प्रतिजैविक गुणधर्म असतात आणि म्हणूनच ते मुरुमांवर उपचार करण्यासाठी खूप प्रभावी मानले जाते. कोरफडीचा घरगुती उपाय करण्यासाठी रात्री मुरुमांवर जेल लावा आणि सकाळी फेसवॉशने स्वच्छ करा. उन्हाळ्यात त्वचेला हायड्रेट ठेवण्यासाठी कोरफड देखील उपयुक्त मानली जाते.

काकडी ही बायोएक्टिव्ह कंपाऊंडचा उत्तम स्रोत मानली जाते आणि त्यामुळे ती पिंपल्स कमी करण्याचे काम करते. आपल्याला ताजी काकडी आणि पाणी लागेल. प्रथम काकडी किसून घ्या आणि नंतर त्याचा लगदा मुरुमांवर लावा. काही वेळाने थंड पाण्याने स्वच्छ करा. तसे, काकडीचा लगदा लावण्यापूर्वी काही मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा. ही पद्धत १५ दिवस फॉलो करा आणि फरक पहा.

## जयपुर येथे ग्रीन आयडॉल पुरस्कार देऊन आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन चा सत्कार.

राजस्थान जयपूर येथील श्री कल्पतरू संस्थान ही मागील तीस वर्षा पासून निसर्ग आणि संस्कृती संवर्धनासाठी वाहिलेली संस्था असून पर्यावरण रक्षणासह विविध सामाजिक प्रश्नांसाठी स्वतः ला समर्पित करून तळागाळात अर्थपूर्ण प्रयत्न करत आहे.



या संस्थेच्या सार्थक प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून राजीव गांधी पर्यावरण पुरस्कार, अमृता देवी विश्नोई पुरस्कार, वनीकरण पुरस्कार, डॉ. एपीजे अब्दुल कलाम नेशन बिल्डिंग पुरस्काराने संस्था सन्मानित झालेली आहे.

श्री कल्पतरू संस्थानने २०४७ पर्यंत ५ कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. (तोपर्यंत भारताला स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण होत असतील.) आणि याच क्रमाने नुकतेच मागील ३० वर्षांत एक कोटी रोपे लावण्याचे आणि जतन करण्याचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.

ही संस्था दरवर्षी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करत असते आणि संस्थेच्या माध्यमातून तळागाळातील पर्यावरण रक्षणासह विविध सामाजिक बाबींच्या क्षेत्रात नि:स्वार्थी आणि अर्थपूर्ण प्रयत्न करणाऱ्या कामगार, संस्था आणि सहभागींना मदत करुन प्रोत्साहन देत आहे. एक पेड मां के नाम मोहिमेची सुरुवात माननीय पंतप्रधानांनी केली होती. ज्यामध्ये श्री कल्पतरू संस्थानला वृक्षारोपण क्षेत्रात केलेल्या जागतिक विक्रमात सहभागी होण्याचा मानही मिळाला होता.

श्री कल्पतरू संस्थेच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था आणि सहयोगी यांना ग्रीन आयडॉल पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनने मागील दोन हजार दहा दिवस अखंड अविरतपणे केलेल्या वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन शहर स्वच्छता, जनजागृती प्लास्टिक निर्मूलन, पाणीबचत इत्यादी कार्याची दखल घेऊन

ग्रीन लातूर वृक्ष सदस्यांनी केलेल्या नि:स्वार्थी आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेउन आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनला 'ग्रीन आयडॉल' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शनिवार, ३० नोव्हेंबर २०२४ रोजी जयपूरच्या इंदिरा गांधी पंचायती राज संस्था, जवाहरलाल नेहरू सभागृह येथे आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन सदस्यांना ग्रीन आयडॉल अवॉर्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी श्री कल्पतरू संस्थांनचे अध्यक्ष विष्णू लांबा यांच्यासह केंद्रीय कृषिमंत्री भगवानदास चौधरी व महाराष्ट्र राज्याचे माजी वनमंत्री सुधीरखी मुनगंटीवार, तेलंगणा राज्याचे मंत्री संतोष कुमार यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

हा पुरस्कार स्वीकार करण्याकरिता लातूर येथून ग्रीन लातूर वृक्षचे सन्माननीय सदस्य बालाजी उमरदंड, गायत्री उमरदंड हे जयपूर येथे गेले होते.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह राज्यातील नेत्यांशी संवाद साधणार, सत्तास्थापनेपूर्वी भाजपच्या गोटात हालचालींना वेग

मुंबई :राज्यातील विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवल्यानंतर महायुती विनासायास सत्तास्थापन करेल, असा अंदाज होता. मात्र, त्यानंतर महाराष्ट्रात सुरु झालेल्या राजकीय नाट्यामुळे महायुतीचा शपथविधी लांबणीवर पडला आहे. आता महायुतीचा शपथविधी ५ डिसेंबरला होईल, असे सांगितले जात असले तरी एकनाथ शिंदे यांची नाराजी आणि मौन पाहता ५ डिसेंबरला तरी महायुतीचा शपथविधी पार पडेल की नाही, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

या सगळ्यामुळे महायुती विशेषत: भाजपच्या गोटातील अस्वस्थता वाढली आहे. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज्यात सत्ता स्थापनेच्या अनुषंगाने चक्र फिरवली जात असल्याचे दिसून येत आहे. अशातच भाजपचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आता महाराष्ट्रातील नेत्यांशी संवाद साधणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्रातील नेत्यांशी संवाद साधणार भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही वेळापूर्वी भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची ऑनलाईन बैठक घेतली. त्यामध्ये, भाजपच्या आमदारांनी सरकार स्थापनेपूर्वी आणि स्थापनेनंतर काय–काय काळजी घ्यायची यासंदर्भात या बैठकीत म ार्गदर्शन करम्यात आलं आहे. महायुतीतील सर्वच मित्र पक्षांच्या गटनेत्यांची निवड झाल्यानंतर आता भाजपचा गटनेता कधी निवडला जाणार याकडे सर्वाचं लक्ष लागलं आहे. त्यामुळे, भाजपचा गटनेता म्हणून कुणाची निवड होईल याची देखील राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

चंद्रशेखर बावनकुळेंनी घेतली ऑनलाईन बैठक तर दुसरीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्रातील नेत्यांशी संवाद साधणार आहेत. भाजपच्या सर्व आमदारांची बैठक २ किंवा ३ डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. तर ५ डिसेंबर रोजी होणाऱ्या शपथविधीला उपस्थित राहण्याच्या सूचनाही आमदारांना देण्यात येणार आहे. त्यासोबतच महायुती सरकारचा शपथविधी होत असताना आपापल्या जिल्ह्यांमध्ये जल्लोष करण्याचे देखील बावनकुळे यांनी सांगितल्याची माहिती आहे. त्यासोबतच प्रत्येक जिल्ह्यातून भाजपचे महत्त्वाचे पदाधिकारी शपथविधीला उपस्थित राहणार असल्याची माहिती पुढे आली आहे. यावेळी सुरक्षेच्या कारणास्तव पासेस देण्यात आलेल्या व्यक्तींनाच आझाद मैदानात प्रवेश दिला जाईल असेही ठरल्याचं कळतंय.

दरम्यान, मुख्यमंत्री पदाचा चेहरा २ डिसेंबरला स्पष्ट होणार असल्याचे बोलले जात आहे. भाजपचा गटनेता ही २ डिसेंबरला निवडला जाणार असून दुपारी १ वाजता विधान भवनात गटनेता निवडीसाठी बैठक होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. या बैठकीला भाजपचे सर्व आमदार उपस्थित राहणार आहे.

राज तिलक की करो तयारी, देवेंद्र फडणवीस यांच्या बॅनरची चर्चा राज्यात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत म हायुतीला स्पष्टपणे बहुमत मिळाल्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे बॅनर लावले या बॅनर वर देवेंद्र फडणवीस हे शपथ घेत असतानाचा फोटो लावण्यात आलाय याच बॅनर वर राज तिलक की करो तयारी असा मजकूर सुद्धा या बॅनर वर टाकण्यात आले भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य चैतन्य बापू देशमुख यांनी बॅनर लावले

## लातूर,नांदेड व पुणे येथून चोरी केलेल्या १० मोटारसायकलीसह एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक !

लातूर (पोअका) : वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.



पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २५/११/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील एक गुन्हेगार त्याने चोरलेली मोटरसायकल विकण्यासाठी भामरी चौक परिसरात फिरत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक २५/११/२०२४ रोजी सदर पथक तात्काळ भामरी चौक परिसरात पोचून रोडवर मोटार सायकलसह थांबलेल्या इसमाला विश्र्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव १) लखन वाघम्बर छपरावळे, वय २४ वर्ष, राहणार हिप्पळगाव, तालुका शिरूर अनंतपाळ, जिल्हा लातूर असे असल्याचे सांगितले.

तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या वाहना संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरची मोटरसायकल दोन वर्षांपूर्वी लातूर शहरातील ठिकाणावरून चोरी केल्याचे सांगितले. तसेच त्याच्याकडे आणखीन तपास केला असता त्याने लातूर सहीत नांदेड व पुणे जिल्ह्यातूनही मोटरसायकली चोरी करून एमआयडीसी परिसरात लपवून ठेवल्याचे सांगितले.

त्यावरून नमूद आरोपीकडून त्याने लातूर नांदेड व पुणे जिल्ह्यातून चोरी केलेल्या एकूण १० मोटरसायकली ज्याची किंमत ३ लाख ५० हजार रुपये असा असून सदरचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस ठाणे शिवाजीनगर लातूर येथील १ गुन्हा, नांदेड जिल्ह्यातील २ मोटरसायकल चोरीचे गुन्हे, तसेच पुणे जिल्ह्यातील ४ मोटारसायकल चोरीचे गुन्हे असे एकूण ०७ मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. आरोपीला पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, विनोद चलवाड, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, गोविंद भोसले, संतोष खांडेकर, राजेश कंचे, चालक पोलीस अमलदार प्रदीप चोपणे, चंद्रकांत केंद्रे, यांनी पार पाडली.

## गावठी कट्टा बाळगणारा इसम ताब्यात, पोलीस ठाणे शिवाजीनगर ची कारवाई !

लातूर (पोअका) : लातूर जिल्हा जिल्ह्यात अवैध



शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांच्या सुचनेनुसार पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथके नेमून कार्यवाही करण्यात येत असतानांच, पोलीस ठाणे शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांचे नेतृत्वात पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीचे विश्र्लेषण करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न होताच दिनांक २४/११/२०२४ रोजी लातूर शहरातील सिताराम नगर परिसरातून एका अल्पवयीन मुलास व एका तरुणाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा (पिस्टल) हस्तगत करण्यात आले आहे.

पोलीस ठाणे शिवाजीनगरच्या विशेष पथकाला गुप्त बातमीदार मार्फत मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर १) गणेश शेंडगे, वय ३० वर्ष राहणार एलआयसी कॉलनी, लातूर. व सोबत एक अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा जप्त करण्यात आल्याची माहिती असून, पोलीस उप निरीक्षक हनुमंत कवले यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४६४/२०२४ कलम ३ ,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद झालेला असून पुढील तपास शिवाजीनगर पोलिस स्टेशनचे चे सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.

पोलीस ठाणे शिवाजीनगरच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात गोपनीय माहितीचे संकलन व विश्र्लेषण करून करून गावठी कट्टा बाळगणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले आहे तर अल्पवयीन मुलास त्यांच्या पालकाच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे व लातूर शहर चे उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्या नेतृत्वातील पथका मधील सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत कवले, पोलीस अमलदार रणजीत शिंदे, बालाजी कोतवाड, अमित लहाने, काकासाहेब बोचरे, सोनवणे यांनी केली आहे.

## आता अंघोळ करणेही महागणार! कंपन्यांनी वाढवले 'या' साबणांचे दर

मुंबई : देशभरात सातत्याने महागाईचा भडका उडताना दिसून येत आहे. सोन–चांदी, भाजीपाला, खाद्य तेल, फळे, पेट्रोल–डिझेल अशा दैनंदिन वापरातील अनेक वस्तूंचे दर वाढत चालले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत आहे. अशातच आता ही महागाई बाथरूमकडेही वळली आहे. साबण बनवणाऱ्या कंपन्यांनी साबणाच्या किमतीत वाढ केली आहे. त्यामुळे आता अंघोळ करणेही महाग होणार असल्याचे चिन्ह दिसून येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंडोनेशिया आणि मलेशियामधून आयात केले जाणाऱ्या शुल्कात वाढ ३५–४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या पामतेलाचा भाव सुमारे १,३७० रुपये प्रति १० किलो आहे. त्यामुळे देशातील दैनंदिन ग्राहकोपयोगी वस्तू कंपन्यांनी अंघोळीच्या साबणाच्या किमतीत ८ टक्क्यांनी वाढ केली आहे.

डव्ह, लक्स, लाईफबॉय, थ्गैग्त, इ्गीम, ींदहर या ब्रँड्सच्या किमती वाढवल्या आहेत. दरम्यान, इश्ण्उ क्षेत्रात सहसा एक कंपनी आधी किमती वाढवते, त्यानंतर हळूहळू इतर कंपन्याही किमती वाढवतात. त्याच धर्तीवर एचयूएल आणि विप्रोनंतर इतर कंपन्याही साबणाच्या किमती लवकरच वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## साप्ताहिक राशिभविष्य दि. 0१ डिसेंबर २०२४ ते 0७ डिसेंबर २०२४

मेष : पत्रव्यवहारातून कळणारी एखादी गोड वार्ता, मुलांच्या बाबतीत सुटलेला एखादा प्रश्न नोकरी–व्यवसायात मिळणारी एखादी महत्त्वाची संधी आणि एखादाच महत्त्वाचा ग्राहक हाती आल्याने होणारा आनंद यापैकी एखादा आनंद आज आपणास ग्रहमान देण्यास सिद्ध आहेत. वादविवाद होतीलही परंतु यशाचा 'ग्राफ' वाढता राहील. कुठेही स्वत:चा हेका चालू न ठेवता समोरच्याचे शांतपणे ऐका. स्वत:ची बाजूही व्यावहारिकदृष्ट्या विचारात घ्या आणि मगच निर्णय घ्यायला लागा.

वृषभ : घरगुती बाबतीत आपणास आनंददायी घटना कळेल. घरातील वृद्धांच्या तब्येतीकडे लक्ष द्या. मुलांचे बाहेर जाऊन भलतेच उद्योग होत नाहीत ना याची काळजी घ्या. चुकून पडलेला पाय इजा घेऊन येऊ शकतो. कोणताही निर्णय आत्मघातकी ठरू शकतो. थोडे शांतपणे व बरेचसे विचारपूर्वकच पाऊल टाकायचे आहे.

मिथुन : आजची एखादी कृतीसुद्धा आपणास मनसोक्त यश देणारी ठरू शकते. थोरामोठ्यांबरोबर होत असलेली उठबससुद्धा आपणास फायद्याची ठरेल. घरात आनंदी वातावरण राहील. आर्थिक व्यवहारात कुठेही मागे पडू नका. कामाचा व्याप कितीही वाढला तरी नाराज होऊ नका.

कर्क : कोणालाही फुकट सल्ला द्यायला जाऊ नका. आपले काम, आपला आर्थिक व्यवहार आणि आपले सगे सोयरे असा खरेतर काहीसा स्वार्थी विचार आज आपणापाशी असणे आवश्यक ठरावे. धर्मकार्याचा बाऊ न करता व्यावहारिकदृष्ट्या आज आपणास अनेक निर्णय घ्यायचे आहेत हे विसरू नका. कामाच्या ठिकाणी काम, घरातल्या ठिकाणी घरचे काम आणि देवधर्माच्या वेळेस फक्त देवधर्म असे वागणेच महत्त्वाचे आहे.

सिंह : एखादी रहस्यमय बातमी हाती येईल. स्नेहसंबंध दृढ होतील. सहज जाता–जाता एखादा आर्थिक व्यवहार संपन्न होईल. आपल्या कार्यात चांगलेच निमग्न राहता येईल. स्त्रियांना आपली हौस भागवून घेता येईल. कामाचे गणित चुकवून नका. जुने विकार बळावल्यास पुरेसे लक्ष द्या. धर्मकार्य करताना कोणतेही वेगळे बोलणे मुळातून टाळा.

कन्या : आज आपल्या बोलण्यावर आपण बरेच काही कमवू शकाल. नोकरदार असो की व्यावसायिक आपणास आज चांगली संधी मिळेल. व्यापारात एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. नोकरदारांना वरिष्ठांशी चांगले सूर जमवता येतील. खर्च होणारा प्रत्येक रुपया हा महत्त्वाचा आहे. विचारपूर्वकच त्याला वाट करून द्या. कोणाच्या बोलण्यावर भुलून किंवा गोड बोलण्यात अडकून खर्च वाढणार नाही असे पहा. विशेषत: खरेदी करताना ही गोष्ट लक्षात ठेवा.

तूळ : आपल्यासाठी एकच महत्त्वाचा आजचा सल्ला म्हणजे हाताखालील लोकांकडून आज बरीच कामे करून घ्यायचे आहेत. ते दुखावले जाणार नाहीत याची काळजी घ्या. आर्थिकदृष्ट्या उधारी वसुली चांगली होईल. व्यापाऱ्यांना ग्राहकांचा प्रतिसाद पुरेसा मिळेल. एखादा धाडसी व्यवहार करून पैशाची तरतूद साधू शकाल. धार्मिक कृत्यातून चांगले समाधान मिळेल.

वृश्चिक : वडिलोपार्जित इस्टेटीचे वाद असतील तर आज तरी वाढवू नका. नोकरी–व्यवसायातले निर्णय आज झटपट घ्यावे लागतील. कोणत्याही मोठ्या खरेदीचा मोह आवरणे हिताचे. त्यातही आपण घरातील कोणाला 'सरप्राईज' देण्याच्या उद्देशातून करत असाल तर थोडे थांबा. आर्थिकदृष्ट्या वसुलीसाठी अन्य कोणाची मदत घ्यावी लागेल. भांडवली गुंतवणूक वाढविता येईल. नव्या औद्योगिक क्षेत्राची बातमी कळेल. कला क्षेत्रात एखादी संधी मिळेल. वाहनांवर मात्र ताबा ठेवा. चेक बुक इ. महत्त्वाच्या वस्तू सांभाळून ठेवा.

धनू : ऐनवेळी कोणाची झालेली मदत, अनपेक्षितपणे वाढलेली आवक किंवा मोठ्या कार्यातील दूर झालेले अडथळे यातून आनंददायी वार्ता समोर येईल. देवावरचा विश्वास वाढावा असा एखादा प्रसंग आज घडणे शक्य. कामाचा ताण वाढता राहील. मित्र–मैत्रिणींसमवेत दिवसातला काही वेळ आनंदात घालवाल. कुणाचे उणे–दुणे काढण्यापेक्षा आपली व्यावहारिक बाजू सशक्त करण्यावर आज विशेष भर द्या. आपल्याकडे असलेल्या माहितीचा योग्य उपयोग करून घेणार आहात.

मकर : राजकारणात असलेल्या मंडळींना वेळीच सावधानतेचा इशारा मिळेल. सामाजिक कार्यातूनही अशीच एखादी धोक्याची घंटी ऐकू येणे शक्य. प्रतिस्पर्ध्यांचे नेमकं डाव लक्षात येतील. नोकरी–व्यवसायात त्याचा अचूक वापर करून घेता येईल. आज प्रवास, पत्रव्यवहार किंवा महत्त्वाच्या अशी गाठभेट यापैकी एखादी गोष्ट फलद्रूप झाल्याचे लक्षात येईल.

कुंभ : कामाच्या ठिकाणी खर्चाचा एखादा मोठा आकडा समोर येणे शक्य. वैवाहिक जीवनात एखादी आनंद वार्ता आपणास कळू शकते. जोडीदाराचा पुरविलेला हट्ट तसेच कुटुंबात कोणाकडून मिळालेली आनंदवार्ता यातून मन उल्हासित बनेल. कोणत्याही परिस्थितीत आपले हितसंबंध दुरावले जाणार नाहीत याची तेवढी काळजी घ्या. कोणालाही एकदम दुखवू नका. कोर्ट–कचेरीची कामे शक्यतो पुढे ढकला.

मीन : सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी राहील. प्रकाशक मंडळींना चांगला लेखक हाताशी येईल. शिक्षण क्षेत्रात नाव मोठे करता येइल. किराणा दुकानदार तसेच शेतकरी इ. मंडळींना आपल्या ज्ञानाचा फायदा करून घेता येईल. आजचा दिवस आपल्यासाठी एखादी संस्मरणीय घटना आणून देणारा ठरू शकतो. एखादा व्यावसायिक निर्णय आपल्या बाजूने लागेल. भेटी गाठी आणि चर्चासत्रे यांना आज विशेष महत्व द्या.

## व्हाईस ऑफ मिडीया डिजिटल मिडीया विंगच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.सितम सोनवणे

लातूर:व्हाईस ऑफ मिडीया डिजिटल मिडीया विंगच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ. सितम सोनवणे यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांची ही निवड व्हाईस ऑफ मिडीयाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, डिजिटल मीडिया विंगचे प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार, डिजिटल मिडीया विंगचे प्रदेश सचिव ईरशाद शेख यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून या संबंधीचे पत्र व्हाईस ऑफ मिडीयाचे प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडीया यांच्याहस्ते त्यांना प्रदान करण्यात आले.



यावेळी व्हाईस ऑफ मिडीयाचे लातूर जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, कार्याध्यक्ष शहाजी पवार, इलेक्ट्रॉनिक विंगचे राज्य उपाध्यक्ष दीपरत्न निलंगेकर, व्हाईस ऑफ मिडीयाचे मराठवाडा कार्यवाहक बाळासाहेब जाधव, रेणापूर तालुकाध्यक्ष विठ्ठल कटके, देवणीचे तालुकाध्यक्ष रेवण मळभागे, लातूर तालुकाध्यक्ष प्रभाकर शिरूरे, काकासाहेब घुटे, देडे, व्हाईस ऑफ मिडीयाचे उपाध्यक्ष योगीराज पिसाळ, चाकूरचे तालुकाध्यक्ष विनोद निडवदे, जळकोट तालुकाध्यक्ष ॲड.अमोल कळसे आदी मान्यवर उपस्थित होते.त्यांच्या निवडीबद्दल लातूर शहर व परिसरातून अभिनंदन होत आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894